मुंबई विकास योजना २४ सात



खुली न्याय्य कार्यक्षम

मुंबईसाठी सुधारित विकास योजना २०३४ प्रसिद्ध करण्याच्या प्रयत्नांना युडिआरआयने २००८पासून चालना दिली होती. महाराष्ट्र प्रादेशीक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ याच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार महाराष्ट्रातील कोणत्याही महानगरपालिकेसाठी असलेली विकास योजना किमान दर वीस वर्षांनी सुधारली गेली पाहिजे. याचा हेतू असा आहे की विकास योजना खुली, न्याय्य आणि परिणामकारक झाली पाहिजे. ही योजना समावेशक, सर्वांच्या गरजा व प्रश्न यांकडे लक्ष पुरविणारी आणि कार्यान्वित करण्याच्या तसेच त्यावर देखरेख ठेवण्याच्या दृष्टीने सहजसोपी हवी. यादृष्टीने युडिआरआयने विकास योजनेच्या प्रक्रियेची चाचपणी सुरू केली तेव्हा आम्हाला जाणवले की या योजनेबाबत कोणतीही जागृती नाही, शिवाय भरीत भर म्हणून की काय शहराच्या स्वत:च्या गरजा किंवा आकांक्षा यांबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नाही. ही उदासीनता दूर करण्याच्या कार्याला आम्ही स्वत:ला बांधून घेतले. मुंबईत उपलब्ध असलेल्या सरकारी/महानगरपालिकेच्या शाळा, इस्पितळे, दवाखाने इत्यादी सेवांबाबत मूलभूत माहितीसाठी केलेले अनेकविध माहितीप्राप्ती अर्ज युडिआरआयने संग्रही ठेवले आहेत.

विकास योजना सुधारित करण्याच्या कायदेशीर अटीची पूर्तता करायला हवी म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेने २००९ मध्ये विकास योजना सुधारीत करण्याचे आपले उद्दिष्ट जाहीर केले. यानंतर विकास योजना सुधारण्याच्या प्रक्रियेसाठी निविदा मागविण्यात आल्या आणि करारावर सह्या झाल्यावर सल्लागारांनी ठराविक कालानुक्रमे माहिती संच प्रसृत केले, ते प्रकाशित करण्यात आले आणि लोकांनी विकास योजनेवर विधायक प्रतिक्रिया दिल्या.

मुंबईचा विकास (२०१४-३४)

— युडिआरआय

छायाचित्राचे श्रेय : मनमीत सिंग गोमान

नियोजन आराखडा

बीज अहवाल, विद्यमान जमीन वापर आराखडे, प्रास्तावीक अभ्यास आणि प्रस्तावित भूवापर अशा पाच वर्षांच्या कालावधीत तयार केलेल्या अनेकविध दस्तावेजीकरणांवर विधायक टीका करून युडिआरआयने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पद्धतीवर प्रभाव पाडला. तरीही युडिआरआय विविध पातळ्यांवर जनजागृती करण्यासाठी आणि मुंबईतील क्षमताबांधणीसाठी वचनबद्ध असल्याने, त्यांनी सार्वजनिक कार्यशाळा, चर्चासत्रे, कार्यक्रम, परिषदा, रचना आलेखन कृतीशाळा, आणि माहिती मिळविणे आणि ती प्रसृत करणे यासाठी सर्वेक्षण हे आयोजित केले; त्या दस्तावेजातील असंख्य चुकांमुळे, या साऱ्याचा अंतिम परिणाम विकास योजनेचा अहवाल मोडीत काढण्यात झाला.

विकास योजना सुधारणा प्रक्रियेतील महत्त्वपूर्ण साध्य होते ते म्हणजे ही योजना अगदी विद्यमान जमीन वापर आराखड्याच्या पायरीपासून लोकांच्या विचारार्थ खुली केली गेली. अधिकृत योजना तयार करून, ती खुली करणे आणि मुंबईतील हितसंबंधीयांकडून त्यावर मते व माहिती मागवणे हे भारतातील कोणत्याही शहराच्या इतिहासात प्रथमच घडले. विकास योजनेबाबत दोन वेळा सार्वजनिक सल्लामसलती घडल्या व आपल्या समस्या व्यक्त करण्याची संधी लोकांना मिळाली.

सार्वजनिक सल्लामसलतीच्या कार्यशाळेची पहिली फेरी जानेवारी २०१४ मध्ये एफ् दक्षिण विभागाच्या कार्यालयात भरविण्यात आली. विकास योजनेमध्ये उल्लेखिलेल्या असंख्य समस्यांवर ती आधारित होती. यामध्ये आरोग्य, शिक्षण, कारभार, नगर रचना, उपजीविका, गृहनिर्माण, पर्यावरण, डिजिटल सुविधांचा समावेश, सार्वजनिक आरोग्य, इत्यादी समस्यांचा समावेश होता. पुष्कळ लोकांनी आपल्या शंका व समस्या या कार्यशाळेत व्यक्त केल्या.

सार्वजनिक सल्लामसलतीच्या कार्यशाळेची दुसरी फेरी ऑगस्ट २०१४ मध्ये घेतली गेली. मुंबईच्या सर्व २४ वॉर्डमध्ये ती घेतली गेली. आपल्या शेजारच्या परिसराशी संबंधीत व आपल्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणाऱ्या प्रश्नांबाबत आवाज उठविण्याची ही लोकांना मिळालेली दुसरी संधी होती.

परंतु हे सारे पालथ्या घड्यावर पाणी ठरले. त्यामुळे विकास योजना जेव्हा प्रसिद्ध झाली तेव्हा त्यातील भरमसाठ चुकांमुळे सरकारला त्याचा विचार करण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली एक त्रिसदस्यिय मंडळ नेमावे लागले; या मंडळाने शिफारस केली की ही विकास योजना निरुपयोगी ठरवून ती सुधारावी.

मुंबई रीडरच्या आधीच्या अंकांमध्ये, बृहन्मुंबई महानगरपालिकेने सुरू केलेल्या विकास योजना प्रक्रियांना युडिआरआयने कशी माहिती पुरविली ते आम्ही तपशीलवार संकलीत केले आहे. युडिआरआयबरोबर काम करणारे हितसंबंधीयांचे गट विकास योजनेसाठी आपापल्या वैयक्तिक सूचना घेऊन आले, त्या साऱ्या मुंबई रीडरच्या आधीच्या अंकांमध्ये लिखित रूपात आल्या आहेत.

मुंबईसाठीची विकास योजना २०३४ अधिकृतरीत्या लोकांच्या छाननीसाठी २५ फेब्रुवारी २०१५ला दिली गेली आणि वर्तमानपत्रांच्या दाव्यानुसार त्यावर ऐंशी हजार हरकती घेतल्या गेल्या. हा आकडा प्रचंड होता आणि त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेला विकास योजनेतील घोडचुकांकडे गंभीरपणे लक्ष देणे भाग पडले. अनेकविध हितसंबंधीयांनी दाखवून दिलेल्या असंख्य चुकांमुळे विकास योजना बाद करावी लागली. आता विकास योजना पुन्हा एकदा आखणीसाठी घेण्यात येऊन सुधारित होते आहे.

युडिआरआयच्या विकास योजना प्रकल्पाबाबतच्या हरकती, वृत्तान्त, घटना, तपशील, सर्वेक्षण निष्कर्ष, इत्यादी तपशील देण्याची परंपरा मोडून, या योजना प्रक्रियेमध्ये ज्या घटना घडल्या त्यांची कालानुक्रमे पुढील पानांवर रूपरेषा सादर करण्याचे आम्ही ठरविले आहे. या घटनांचा कालावधी, विकास योजनेच्या सुधारणेचा हेतू जाहीर होण्यापासून ते विकास योजनेचे 'तथाकथित' बाद होणे येथपर्यंतच्या सर्व घटनांचा समावेश आहे. आमची मनापासूनची इच्छा आहे की आमच्या प्रयत्नांची कदर केली जावी.



छायाचित्राचे श्रेय : मनमीत सिंग ओबान



Municipal Corporation of Greater Mumbai
(MCGM)
Invitation for Expression of Interest
(EOI)
For
Short listing of Consultants for
REVISION OF DEVELOPMENT PLAN
FOR GREATER MUMBAI FOR THE
PERIOD
2014 -2034

Development Plan
Second Workshop

DP Project

UDRI
Development Plan Second Workshop
6th October 2009
5.00pm to 7.30pm
Set up of working focus groups on 11 critical issues and setting up of working agenda.
Venue
Urban Design Research Institute, No 43, V.B. Gandhi Marg, Kala Ghoda, Mumbai 023
URBAN DESIGN RESEARCH INSTITUTE

The Urban Design Research Institute cordially invites you for the "UDRI Workshop 2009"
Programme :-
Panel
Venue
Coomaraswamy Hall
Date
1st September 2009, Tuesday
मुंबईREADER

ऑक्टोबर — विकास योजनेसाठी दुसरी सभा ६ ऑक्टोबर २००९ रोजी युडिआरआयमध्ये.

सप्टेंबर — मुंबई २४ सातचे युडिआरआयकडून उद्घाटन

जून — मुंबईतील योजनेसाठी युडिआरआयनी रचना स्पर्धा (डिझाईन शॅरड्) घेतली.

२००८

२००९

जून — विकास योजना सुधारित करण्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे उद्दिष्ट जाहिर.

डिसेंबर

योजनेची तत्त्वे निश्चित केली

योजनेची एकत्रित तत्त्वे महानगरपालिकेकडे एससीइ गट व बृहन्मुंबई महानगरपालिकेचा विकास योजना विभाग यांच्याबरोबर बैठक.

ऑक्टोबर

विकास योजनेबाबत हितसंबंधीयांची एकत्रित बैठक.

ऑगस्ट

भाडे नियंत्रण सुधारणांबाबत मुख्यमंत्र्यांना पत्र : मॉडेल रेसिडेन्शियल टेनन्सी ॲक्ट.

१२ नागरी विषय निश्चित

हितसंबंधीयांच्या सभा :

जुलै

विकास योजनेबाबत हितसंबंधीयांची एकत्रित बैठक

जून

आरोग्य, शिक्षण, पाणी व सार्वजनिक आरोग्य, ऊर्जा

मे

पर्यावरण, गृह, राज्यकारभार, वाहतूक

लोकांचे अग्रक्रम निश्चित करण्यासाठी सर्वेक्षण

जानेवारी

एओए आणि आयआयइ सीओए बरोबर युडिआरआयचे तीन महिने व्हर्टिकल स्टुडिओज.

२०११

एप्रिल

बृहन्मुंबई महानगरपालिकेने सल्लागारांबरोबरच्या करारावर सह्या केल्या.

मे

बीज अहवाल - बृहन्मुंबई महानगरपालिका.

मे

माहिती हक्क अर्ज दाखल, सार्वजनिक सभा घेतल्या, हितसंबंधीयांचे गट तयार केले

महानगरपालिका आयुक्तांना पत्र : इतर सेवाभावी संस्थांचा सहभाग घ्यावा आणि कोणत्याही आर्थिक व्यवहाराच्या आश्वासनाशिवाय महानगरपालिकेला मदत करावी तसेच विकास योजनेबाबत शहरामध्ये जागरूकता निर्माण करावी.

फेब्रुवारी

महानगरपालिका, मुख्यमंत्री, नागरी विकास ०१ चे प्रमुख सचिव यांना विकास योजना तयार करण्यामध्ये विस्तृत सल्लामसलत व्हावी, याला चालना मिळावी व त्याची खात्री व्हावी याकरिता पत्र.

२०१०

मे

फेब्रुवारी २०१० च्या पत्राला महानगरपालिका आयुक्तांचे उत्तर : विकास योजनेच्या तयारीच्या विविध टप्प्यांवर बृहन्मुंबई महानगरपालिका हितसंबंधीयांना गुंतवून घेईल.

सद्यकालीन भूवापराच्या पडताळणीसाठी युडिआरआयने मार्गदर्शिका तयार केली.

नोव्हेंबर विकास योजनेतील सद्यकालीन भूवापरासंदर्भात मुंबई महानगरपालिकेमध्ये स्थायी समितीच्या अध्यक्षांबरोबर बैठक सद्यकालीन भूवापर कार्यशाळा नोव्हेंबर २०१२.

एकजिनसी योजना तत्त्वे, १२० सह्यांसोबत बृहन्मुंबई महानगरपालिकेला सादर.

ऑक्टोबर सद्यकालीन भूवापराच्या माहितीसंदर्भात महानगरपालिकेच्या आयुक्तांबरोबर बैठक.

सप्टेंबर महामुंबईच्या विकास योजनेच्या २०१४-३४ सुधारणेसाठी सद्यकालीन भूवापर योजनेबाबत निरीक्षणे व शिफारशी (तपशील पुरवणीमध्ये) महानगरपालिका आयुक्तांना पत्र.

सद्यकालीन भूवापराच्या माहितीतील महत्त्वाच्या चुका - बृहन्मुंबई महानगरपालिकेला सद्यकालीन भूवापराची माहिती सुधारण्यास सांगण्यात आले.

जुलै बृहन्मुंबई महानगरपालिकेने तयार केलेल्या सद्यकालीन भूवापराची प्राथमिक माहिती. महानगरपालिका आयुक्तांना व आधीच्या तीन महानगरपालिका आयुक्तांना पत्र.

मे विकास योजना २०१४-३४ च्या सुधारणेसाठी सल्लागार कार्यशाळा ज्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेला सभांचे नियोजन करण्यास मदत झाली.

२०१२

मार्च सद्यकालीन भूवापर प्रकाशित

Shri Sitaram Kunte,

Municipal Commissioner, MCGM

Mumbai – 400001

Sub: **Requesting confirmation of the workshop schedules for the Development Plan revision process along with the shared roles and responsibilities of organizers and MCGM.**

Dear Sir,

This is with regards to the consultative workshop organized by MCGM concerning the Preparatory Studies on 29th November 2013 in FS ward office conference hall. First of all, we all would again appreciate the participatory steps initiated by the MCGM for the Development Plan process. We land the promises made by you to ensure people's participation at the ward level and your willingness to have consultations at with stakeholders from different planning sectors.

This is to inform you that the supporting organizations met on 3 December 2013 and have decided on the dates for having sector-wise workshops. The main issues that emerged with concerns as a result of the meeting are presented under various sub-heads as follows:

Schedule of sector-wise workshops with stakeholder groups

S. no.	Planning sectors	Supporting Organization's	Workshop date
1	Health	UDRI	29th Jan 2013
2	Gender	Akshara	04 Jan. 2014
3	Education	UDRI	08 Jan. 2014
4	Environment	CAT	09 Jan. 2014
5	Solid waste management and Sanitation	SMS, Akaar Mumbai	10 Jan. 2014
6	Shares	YUVA, Nivara Haq, CHR, SRS, Awaas Adhikar Sanstu	12 Jan. 2014 (tentative date)
7	Urban Form	UDRI	13 Jan. 2014
8	Water	YUVA	16 Jan 2014
9	Gaothans, Koliwadas, Andhrasipadas	KRVIA	18 Jan. 2014
10	Informal	YUVA	22 Jan. 2014
11	Housing	TISS	25 Jan. 2014
12	Transport	MTSU	
13	OCR	PLATA	
14	Children		
15	People with disability		
16	Digital Inclusion with	IIT Bombay, UDRI	5th Feb 2014

हितसंबंधीयांबरोबरच्या बैठकांची दुसरी फेरी पूर्ण
गगनचुंबी इमारतींबाबतचा निर्णय युडिआरआयच्या बाजूने

डिसेंबर

विकास योजना सुधारणा प्रक्रियेसाठी आयोजित कार्यशाळांच्या वेळापत्रकाबाबत तसेच त्याबाबत आयोजक आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या मधील भूमिका व जबाबदाऱ्या वाटून घेण्याबाबत निश्चितीची मागणी करणारे, महानगरपालिका आयुक्तांना पत्र

नोव्हेंबर

नागरी विकास १ च्या प्रमुख सचिवांना पत्र, पूर्वतयारी अभ्यासामधील प्राथमिक निरीक्षणे
विकास योजना २०१४-३४ च्या सुधारणेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेचा अहवाल प्रकाशित

ऑगस्ट

– सुधारित कार्यकालीन रूपरेषेनुसार (झालेल्या कामांच्या पूर्तीबाबत) प्रसिद्धी नाही
– इतर देय गोष्टींचीही पूर्ती नाही
– विकास योजना प्रक्रियेत एसपीए आणि झोपडपट्ट्यांचा समावेश करण्यासाठी बैठक
– प्रत्येक वॉर्डमध्ये साहाय्य कक्ष सुरू करणे
– सर्व एएमसी/डीएमसी, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सर्व विभाग यांना विकास योजनेच्या
– सुधारणेमध्ये गुंतविणे

मे

सद्यकालीन भूवापरासंबंधी चर्चा करण्यासाठी स्थायी समितीच्या अध्यक्षांबरोबर बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये बैठक

फेब्रुवारी

झोपडपट्ट्यांचे नकाशीकरण आणि तीन सद्यकालीन भूवापरांमधील एसपीए जागांबाबत मुख्यमंत्र्यांना पत्र

जानेवारी

स्थायी समितीच्या अध्यक्षांबरोबर बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये बैठक

२०१३

मे

बृहन्मुंबई महानगरपालिकेने सुधारित सद्यकालीन भूवापर प्रकाशित केला

जून

प्रकल्पासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने अत्यंत खुली सुधारित कार्यकालीन रूपरेषा प्रसिद्ध केली

नोव्हेंबर

प्रास्तावीक अभ्यास प्रकाशित

डिसेंबर

गगनचुंबी इमारतींबाबत तेथील मंचसदृश बांधकामांवर (पोडियम) मर्यादा आणणारा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

प्रास्तावीक अभ्यासावरील भाष्य

डिसेंबर – विकास योजनेच्या अध्यक्षांना पत्र, विकास योजनेच्या काही समस्यांवर पुन्हा विचार करण्याची विनंती
मुंबईचे नकाशीकरण, मोकळ्या जागा, परिमाणांचे शिथिलीकरण, चितळे कमिटीचा अहवाल, झोपडपट्ट्या व एसपीए यांचा समावेश

ऑगस्ट – समस्या विषयानुसार व प्रभाग पातळीवरील बैठका युडिआरआयने घडवुन आणल्या

जून – विकास योजना अध्यक्षांना पत्र, विकास योजना २०१४-३४साठी वॉर्ड पातळीवर सल्लागार कार्यशाळांचे वेळापत्रक

एप्रिल – लोकसभा निवडणुकीच्या सर्व उमेदवारांना पत्र, मुंबईच्या विकास योजना २०१४-३४च्या सुधारणेमध्ये हितसंबंधीयांनी तयार केलेल्या योजना तत्त्वांचा समावेश करण्याबाबत

मार्च – महानगरीच्या आयुक्तांना पत्र, विकास योजना २०१४-३४ साठीच्या सद्यकालीन भूवापर सर्वेक्षणात विशेष नियोजन क्षेत्राचा समावेश नाही

जानेवारी – समस्यांनुसार हितसंबंधीयांच्या बैठका (एफ् दक्षिण वॉर्ड कार्यालय)

- विकास नियामक नियम (डीसीआर) सोपे करणे
- स्त्री-पुरुष भेदांची जाणीव
- शिक्षण
- पर्यावरण आणि टिकावू शहर
- सांडपाणी व्यवस्थापन आणि सार्वजनिक आरोग्य
- झोपडपट्ट्यांतील घरे
- नगर रचना
- पाणी
- गावठाण आणि कोळीवाडे
- अनौपचारिक क्षेत्र, सार्वजनिक सोयी आणि औपचारिक घरबांधणी
- आरोग्य
- माहिती व संसूचना यांची पायाभूत बांधणी, डिजिटलचा समावेश

२०१४

ऑगस्ट – बृहन्मुंबई महानगरपालिका - प्रास्तावीक अभ्यासाबाबत प्रभाग पातळीवरील हितसंबंधीयांच्या बैठका

विकास योजनेत सुधारणा करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेला सहकार्य करणे सुरू

विशेष कार्यकारी अधिकारी यांना पत्र- मुंबई २०३४ विकास योजना सुधारणा, योजना तत्त्वे, इतिवृत्तान्त, पत्रव्यवहार, अभ्यास आणि अहवाल आणि तक्ते इत्यादींचे संकलन — जून

'ही विकास योजना बरखास्त करा' मोहीमेला युडिआरआयकडून सुरुवात — एप्रिल

महानगरपालिका आयुक्तांना पत्र, मुंबई विकास योजना २०१४-३४ च्या प्रस्तावित मसुद्याची छापील प्रत न परवडणारी विकास योजना अध्यक्ष, स्थायी समितीचे अध्यक्ष यांना पत्र, प्रस्तावित विकास योजना २०१४-३४ यांबाबत सूचना/हरकती आणि सुनावणीची विनंती (भाग १, भाग २, भाग ३) — एप्रिल

विकास योजना अध्यक्ष, स्थायी समितीचे अध्यक्ष यांना पत्र, प्रस्तावित विकास योजना २०१४-३४ यांबाबत सूचना/हरकती आणि सुनावणीची विनंती — मार्च

महानगरपालिका आयुक्त व स्थायी समितीचे अध्यक्ष यांना पत्र, मुंबईसाठीच्या विकास योजनेचा २०१४-३४ मसुद्याबाबत सूचना आणि हरकती यांसाठी साठ दिवसांच्या कालावधीची मुदतवाढ — मार्च

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या, स्थायी समितीचे अध्यक्ष यांच्याकडून हितसंबंधीयांच्या सल्लागार कार्यशाळा मुख्यमंत्र्यांना पत्र, एफएसआयमधील प्रस्तावित वाढीच्या समस्येची दखल घेण्याची विनंती स्थायी समितीचे अध्यक्ष व महानगरपालिका आयुक्त यांच्याबरोबर विकास योजना २०३४ च्या मसुद्यावर चर्चा करण्यासाठी बैठक — फेब्रुवारी

२०१५

प्रस्तावित भूवापर प्रकाशित — फेब्रुवारी

महाराष्ट्र शासनाकडून त्री-सदस्य कमिटी-विकास योजनेतील त्रुटींचे परिशीलन करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत सांगितले - विकास योजना रद्द करून त्यात सुधारणा करण्यास सुरुवात — एप्रिल